॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२४–२५/८१ दिनांक १०/०७/२०२४

<u>अत्यंत महत्वाचे कालमर्यादीत परिपत्रक</u>

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ

**विषय: खालील महाविद्यालयांनी रा.से.यो. वार्षिक खर्चाच्या अंकेक्षण करणे व सर्व महाविद्यालयांनी तात्काळ वार्षिक लेखे व अहवाल सादर करणे बाबत.**

संदर्भ: मा. अजय बा. शिंदे, क्षेत्रीय निदेशक, क्षेत्रीय निदेशालय रा.से.यो. पुणे यांचा दिनांक ०३/०७/२०२४ रोजीचा व्हॉट्स अप संदेश.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय व्हॉट्स अप संदेशान्वये मा. अजय बा. शिंदे, क्षेत्रीय निदेशालय रा.से.यो. पुणे यांनी सन २०२३–२४ नियमित व विशेष वार्षिक शिबीराचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनाने तात्काळ सादर करण्याबाबत कळविले असल्याचे कळविले आहे व उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय शिल्लक राहिलेले अनुदान मिळणार नसल्याचे ही कळविले आहे.

या बाबत राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमांतर्गत सन २०२३–२४ अंतर्गत नियमित कार्य व विशेष शिबीर कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या अंकेक्षणाचा कार्यक्रम दिनांक १६ मे ते दिनांक २४ मे २०२४ या कालावधीत केंद्रीय पध्दतीने आयोजित करण्यात आला होता व वार्षिक लेखे १० जून २०२४ पर्यत रा.से.यो. विभागात सादर करण्याबाबत यापूर्वीच्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते तथापी प्रशासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, खालील महाविद्यालयांनी नियमित व विशेष शिबीर खर्चाचे अंकेक्षण अद्यापही करून घेतलेले नाही.

१) दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर ता.जि. लातूर
२) इंदिरा इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, विष्णुपूरी, नांदेड
३) संत तुकाराम विधी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर
४) स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद ता.मुखेड जि. नांदेड

तरी त्या अनुषंगाने उपरोक्त रा.से.यो. संलग्नीत महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, सन २०२३–२४ अंतर्गत नियमित खर्चाचे व विशेष शिबीराचे त्वरित अंकेक्षण करून घ्यावे व लेखे व अहवाल सादर करण्यात यावा तसेच ज्या महाविद्यालयांचे सन २०२३–२४ चे नियमित खर्चाचे व विशेष शिबीराचे अंकेक्षण झालेले आहेत त्या महाविद्यालयांनी व उपरोक्त चार महाविद्यालयांनी लेखे <u>दिनांक १६ जुलै २०२४</u> पर्यत त्वरीत राष्ट्रीय सेवा योजना विभागात सादर करण्यात यावेत. उक्त दिनांका नंतर लेखे स्विकारण्यात येणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी व संबधित महाविद्यालयास मिळालेले अनुदान विद्यापीठास परत करावे लागेल तसेच उक्त दिनांका पर्यत लेखे सादर न केल्यास पुढील अनुदान मिळण्यासाठी येणा–या अडचणीस आपले महाविद्यालय सर्वस्वी स्वत: जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

<u>प्रत माहितीस्तव:</u>

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

<u>प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:</u>

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.